गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत बाधित गावठाण मौजा खापरी (रेहपाडे), ता. पवनी, जि. भंडारा करिता पर्यायी गावठाण मौजा कच्चेखाणी येथे नागरी सुविधेअंतर्गत उघडी गटारे (Drainage Work) बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: आरपीए-२०२६/प्र.क्र. 1535903/पुनर्वसन-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ७ एप्रिल, २०२६

**वाचा:**

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. आरपीए २००८/प्र.क्र.२४४/र-१, दि. ३१.०८.२००९.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि. १९.११.२०१५ (सन १९७६ नंतरच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित गावांच्या पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधांच्या कामांवरील अधिकारांविषयी).

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. सुप्रमा-२०२४/प्र.क्र.३४२/मोप्र-२, दि. २२.०५.२०२५ (गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पास चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता संदर्भात).

मुख्य अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा तांत्रिक मंजुरी आदेश क्र. ४६९३/मुअगोप्र/तां.२(१)/गोसीखुर्द/२०२५, दि. २४.१२.२०२५.

विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. क्र.स.म.अ./पुनर्व/अंदाजपत्रक/कावि- ०३/२०२६ दि. ०६.०१. २०२५.

**प्रस्तावना:**

विभागीय आयुक्त, नागपूर यांनी गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत बाधित गावठाण मौजा खापरी (रेहपाडे) करिता पर्यायी गावठाण मौजा कच्चेखाणी येथे नागरी सुविधेअंतर्गत उघडी गटारे (Drainage Work) बांधकामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. आरपीए २००८/प्र.क्र.२४४/र-१, दि. ३१.०८.२००९ अन्वये मौजा खापरी (रेह/रेहपाडे) या गावाचे “खास बाब म्हणून १०० टक्के पुनर्वसन” करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, एकूण २६१ घरांचे (गावठाणातील २२५ व गावठाणाबाहेरील ३६ घरे) पुनर्वसन प्रस्तावित आहे.

१. गोसीखुर्द प्रकल्पाचा अंतर्भाव प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) अंतर्गत असून, सर्व कामे जून २०२८ अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे; त्या दृष्टीने पर्यायी गावठाण मौजा कच्चेखाणी येथील उघडी गटारे (Drainage Work) ही पुनर्वसित गावठाणातील अत्यावश्यक नागरी सुविधा म्हणून ओळखण्यात आलेली आहे.

२. उघडी गटारे (Drainage Work) बांधकामासंदर्भातील रु. १८,८२,५९,८११/- (रु. अठरा कोटी ब्याऐंशी लक्ष एकोणसाठ हजार आठशे अकरा फक्त) इतके अंदाजपत्रक मुख्य अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी तांत्रिकदृष्ट्या मंजूर केले आहे.

३. सदर अंदाजपत्रकाचा अंतर्भाव पुढीलप्रमाणे लेखाशिर्षाखाली आहे "४७०१ मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, उपशिर्ष (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूक, (४) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (संगणक सांकेतिक क्रमांक ४७०१/H/६६-५), विभागीय शिर्ष -गोसीखुर्द प्रकल्प I-Headworks, B-Rehabilitation, मौजा खापरी (रेहपाडे) करिता पर्यायी गावठाण मौजा कच्चेखाणी येथे उघडी गटारे (Drainage Work) चे बांधकाम॰."

४. महसूल व वन विभागाचा शासन निर्णय दि. १९.११.२०१५ नुसार सन १९७६ नंतरच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित गावांच्या पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत; तथापि रुपये दहा कोटीपेक्षा अधिक रकमेच्या कामांच्या अंदाजपत्रकास वित्तीय मंजुरीसह प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार शासनास राहतील असे नमूद आहे.

५. गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत नागपूर व भंडारा जिल्ह्यातील पर्यायी गावठाणातील नागरी सुविधा कामांकरिता राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने एकूण - रु. ३०३.९७ कोटी इतकी तरतूद (मौजा रुयाड - २०.६१ कोटी, मौजा अड्याळ - १११.१० कोटी व मौजा कच्चेखाणी - १०५.८४ कोटी) शिफारस केलेली असून, त्यानुसार मौजा कच्चेखाणी येथील नागरी सुविधांच्या बांधकामाचे वित्तीय दायित्व जलसंपदा विभागाने स्वीकारलेले आहे.

म्हणून, सदर उघडी गटारे (Drainage Work) बांधकामाच्या रु. १८,८२,५९,८११/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:**

वरील सर्व बाबींचा विचार करून, गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत बाधित गावठाण मौजा खापरी (रेहपाडे), ता. पवनी, जि. भंडारा करिता पर्यायी गावठाण मौजा कच्चेखाणी येथे नागरी सुविधेअंतर्गत उघडी गटारे (Drainage Work) बांधकामाच्या रु. १८,८२,५९,८११/- (रु. अठरा कोटी ब्याऐंशी लक्ष एकोणसाठ हजार आठशे अकरा फक्त) इतक्या अंदाजपत्रकास, पुढील अटींच्या अधीन राहून, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

१. सदर नागरी सुविधा कामांकरिता आवश्यक गौण खनिज स्वामित्वधन/स्वामित्व शुल्क इत्यादीची वसुली व त्याबाबतची कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयन यंत्रणेची राहील.
२. अंदाजपत्रक तयार करताना सार्वजनिक बांधकाम विभाग दरसूची २०२२-२३ व जलसंपदा विभाग दरसूची २०२३-२४, सिमेंट व लोखंडाचे प्रचलित दर तसेच नजीकच्या जिल्हा मुख्यालयाचे वहन अंतर विचारात घेण्यात आलेले असून, भविष्यात या बाबींविषयी उद्भवू शकणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या हरकती/दाव्याबाबत संपूर्ण जबाबदारी संबंधित अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता यांची राहील.
३. अंदाजपत्रकात दर्शविलेल्या सर्व मोजमापे, दर, GST (१८ टक्के), स्वामित्व शुल्क रु. ६०० प्रति ब्रास इत्यादी तरतुदींनुसारच कामे करावीत व त्यामध्ये कोणताही अनधिकृत बदल/वाढ करण्यात येऊ नये.
४. सदर कामांवर होणारा खर्च मंजूर अंदाजपत्रक आणि विहित मर्यादा यांच्या अधीन राहील; मंजूर रकमेपेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची विशेष दक्षता संबंधित मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी घ्यावी.
५. पुनर्वसन योजनेतून पुरविण्यात येणाऱ्या या नागरी सुविधांसाठी अन्य कोणत्याही योजनेतून निधीचा वापर केला जाणार नाही तसेच सदर कामे यापूर्वी अन्य कोणत्याही योजनेतून

करण्यात आलेली नाहीत, अथवा त्यावर पूर्वी खर्च करण्यात आलेला नाही, याचे प्रमाणपत्र विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी शासनास सादर करावे.

६. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यनियमावलीतील सर्व प्रचलित नियम व प्रक्रिया पाळूनच सदर कामांची अंमलबजावणी करण्यात येईल व संबंधित मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली असावी.

७. कामांचा दर्जा व गुणवत्तेबाबत आवश्यक चाचण्या, देखरेख व निरीक्षणाची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांची राहील.

८. कामे पूर्ण झाल्यानंतर संबंधित कार्यकारी अभियंता यांनी (अ) काम पूर्णता अहवाल, (आ) उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate), (इ) सदर कामे अन्य कोणत्याही योजनेतील निधीतून पूर्ण न केल्याचे प्रमाणपत्र, व (ई) Geo-tagging करून तयार केलेले प्रमाणपत्र विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनास सादर करावे.

६. निधी वितरण व लेखाशिर्ष:

सदर नागरी सुविधा कामांवर होणारा खर्च "४७०१ मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, उपशिर्ष (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूक, (४) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (४७०१/H/६६-५), विभागीय शिर्ष गोसीखुर्द प्रकल्प I-Headworks, B-Rehabilitation, मौजा खापरी (रेहपाडे) करिता पर्यायी गावठाण मौजा कच्चेखाणी येथे उघडी गटारे (Drainage Work) चे बांधकाम" या लेखाशिर्षाखाली जलसंपदा विभागामार्फत अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करण्यात येईल आणि त्याचे संपूर्ण वित्तीय दायित्व जलसंपदा विभागाचे राहील.

७. अधिकार व मान्यता:

प्रस्तुत शासन निर्णय, महसूल व वन विभागाचा शासन निर्णय दि. १९.११.२०१५ तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग तीन, अ.क्र.४, परिच्छेद २७(२)(अ) यांन्वये प्राप्त अधिकारात व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in येथे उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२६०४०७१२०३५७१११९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAJESH HEMCHAND BAGDE
Date: 2026.04.07 12:06:58 +05'30'

**( राजेश बागडे )**
**उप सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत:**

१. जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. विभागीय आयुक्त, नागपूर
३. जिल्हाधिकारी, भंडारा.
४. मुख्य अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
५. अधीक्षक अभियंता, मंडळ.
६. कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प.

७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (२ प्रतीजिल्हा कोषागार अधिकारी, भंडारा
८. वित्त विभाग, कार्यासन व्यय/अर्थसंकल्प.
९. नस्ती व संबंधित प्रकरण फाईल.